निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

* नांदेड * परभणी * हिंगोली

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक २८५ * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * सोमवार दि.१६ फेब्रुवारी २०२६ | * पाने-४

### पाकिस्तानने पुन्हा एकदा 'हरून दाखवलं'

## भारतीय संघाचा ६१ धावांनी दणदणीत विजय

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली –** वर्ल्डकप स्पर्धेत भारत-पाकिस्तान सामना नेहमीच चर्चेत असतो. मात्र प्रत्यक्ष मैदानावर हा सामना एकतर्फी, एकसुरीच ठरतो हे पाकिस्तानने पुन्हा एकदा सिद्ध केलं. कोलंबोतल्या आर. प्रेमदासा स्टेडियमच्या संथ आणि धीम्या खेळपट्टीवर भारतीय संघाने १७५ धावांची मजल मारली. प्रत्युत्तरादाखल खेळताना पाकिस्तानने पॉवरप्लेमध्येच तीन शिलेदार गमावले. यानंतर सातत्याने विकेट्स गमावत पाकिस्तानच्या संघाने मान टाकली. त्यांचा डाव .. आटोपला. पाकिस्तानने मूळ योजनेनुसार या लढतीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला होता. आर्थिक नुकसान शक्यता आणि आयसीसीची मध्यस्थी यानंतर पाकिस्तानने ही लढत खेळण्याचा निर्णय घेतला. अंतर्गत बंडाळ्यांनी ग्रस्त पाकिस्तान संघाला सर्वसमावेशक खेळ करणं जमलं नाही आणि त्यांच्या नावावर पुन्हा एकदा पराभूत असा शिक्का बसला. या विजयासह भारतीय संघाने तीनपैकी तीन सामने जिंकले आहेत. त्यामुळे बाद फेरीचा मार्ग सुकर झाला आहे. दुसरीकडे पाकिस्तानला बाद फेरीसाठी संघर्ष करावा लागणार आहे.



पाकिस्तानने टॉस जिंकून बॉलिंगचा निर्णय घेतला. कर्णधार सलमान अली अघा गोलंदाजीला आला. पहिल्या षटकात फिरकी आक्रमणाचा निर्णय पाकिस्तानने घेतला. अभिषेक शर्माला बाद करत सलमानने हा निर्णय योग्य ठरवला. यानंतरही पाकिस्तानने फिरकी बहुल आक्रमणावर भर दिला. तिलक वर्मा झगडत असतानाही इशान किशनने जोरदार फटकेबाजी केली. फिरकी आणि वेगवान अशा दोन्ही गोलंदाजांवर तुफान आक्रमण करत इशानने इरादे स्पष्ट केले. इशानच्या ४० चेंडूत १० चौकार आणि ३ षटकारांसह ७७ धावांच्या खेळीसह भारताच्या विजयाचा पाया रचला. सईम अयुबने इशानला बाद केलं. इशान बाद झाल्यानंतर खेळपट्टीवर आलेल्या प्रत्येक फलंदाजाला धावांसाठी झगडावं लागलं. तिलक वर्माने २४ चेंडूत २५ तर सूर्यकुमार यादवने २९ चेंडूत ३२ धावा केल्या. भरवशाचा हार्दिक पंड्या भोपळाही फोडू शकला नाही. शिवम दुबेने १७ चेंडूत २७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. संपूर्ण डावात केवळ ६ षटकार लगावले गेले. पाकिस्तानतर्फे सईम अयुबने ३ विकेट्स पटकावल्या.

आव्हानात्मक लक्ष्याचा पाठलाग करताना मैदानात उतरलेल्या पाकिस्तानने पहिल्याच षटकात साहिबजाहा फरहानला गमावले. हार्दिक पंड्याने त्याला बाद केलं. जसप्रीत बुमराहच्या भेदक यॉर्करसमोर सईम अयुब निरुत्तर झाला.

बुमराहच्या गोलंदाजीवर फटकेबाजी करण्याचा मोह सलमान अली अघाला आवरला नाही आणि तोही बाद झाला. बाबर आझमने डाव सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र अक्षर पटेलने त्याला त्रिफळाचीत केलं. उस्मान खानने ४४ धावांची एकाकी झुंज दिली. बाकी फलंदाजांनी हाराकिरी केल्यामुळे पाकिस्तानचा डाव ११४ धावांतच आटोपला. भारतातर्फे हार्दिक पंड्या, जसप्रीत बुमराह, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या.

## कोठारी (ची.) गावच्या कन्येचा आदिलाबाद महानगरपालिकेत दणदणीत विजय

*** आत्ताच एक्सप्रेस**

*** लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट–** किनवट तालुक्यातील कोठारी (ची.) गावची कन्या सौ. सूचिका मनोज पवार पाटील यांनी तेलंगणा राज्यातील आदिलाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्रमांक ३६ मधून भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार म्हणून नगरसेवक पदाची निवडणूक प्रचंड बहुमताने जिंकत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



त्या कोठारी (ची.) येथील श्री. सुरेशराव पाटील काकडे यांची कन्या तसेच श्री. पवन सुरेशराव काकडे पाटील यांची बहीण असून आदिलाबाद येथील श्री. संभाजी पाटील पवार यांची सून आहेत. नुकत्याच पार पडलेल्या तेलंगणा राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाले असता त्यांच्या विजयाची अधिकृत घोषणा करण्यात आली.

सौ. पवार पाटील यांनी एकूण ९२४ मते मिळवत प्रतिस्पर्ध्यांवर मोठी आघाडी घेतली. काँग्रेस पक्षाच्या उमेदवार सौ. लक्ष्मी राजेंद्र गांद्रथ, ज्या मागील सुमारे ३० वर्षांपासून सत्तेत होत्या, त्यांना यावेळी केवळ ५०५ मते मिळाली. बीआरएस पक्षाच्या आरिफा अंजुम यांनी ४०० मते घेत तिसरे स्थान पटकावले, तर एआयएफबी पक्षाच्या मुजकिरा मुस्कान यांनी १३६ मते मिळवत चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. तब्बल ४२० मतांच्या फरकाने मिळालेला हा विजय एकतर्फी आणि दणदणीत मानला जात आहे.

या विजयाबद्दल आदिलाबाद जिल्ह्याचे आमदार पायल शंकरजी, किनवटचे आमदार भीमरावजी केराम, स्वामी प्रॉपर्टीज अँड डेवलपर्सचे विशाल स्वामी गोणेवार, सुनील गरड, संदीप सोपानराव केंद्रे, कोठारीचे माजी सरपंच तुळशीराम देवजी गेडाम, बालाजी पाटील मुरकुटे, करपुडे पाटील, सुधाकर काकडे पाटील,संभाजी पाटील पवार (आदिलाबाद), अरविंद पाटील शिंदे (मांडवा), गंगाधर पाटील बिजोरे (दरसांगवी), संदीप पाटील साळुंके (वडोली), लक्ष्मण पाटील अडकीने (राजगड) आणि खंडू पाटील काकडे यांसह अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

या ऐतिहासिक विजयामुळे कोठारी (ची.) गावासह किनवट तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून स्थानिक नागरिकांकडून सौ. पवार पाटील यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## सोशल मीडियावर पत्रकाराचा अपमान; दोषींवर कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा

*** आत्ताच एक्सप्रेस**

*** लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट–** किनवट तालुक्यातील पत्रकारितेचा सन्मान धुळीस मिळवणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. साप्ताहिक ''किनवट संघर्ष'' चे संपादक जयवंत गणपत चव्हाण यांनी सोशल मीडियावर झालेल्या अपमानास्पद व बदनामीकारक टीकेविरोधात किनवट पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करून दोषींवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

तक्रारीनुसार, जयवंत चव्हाण हे गोकुंदा (ता. किनवट) येथील रहिवासी असून त्यांनी सुमारे २० वर्षे विविध दैनिकांमध्ये पत्रकार म्हणून काम केले आहे. सेवेनिवृत्तीनंतर त्यांनी स्वतःच्या मालकीचे ''साप्ताहिक किनवट संघर्ष'' सुरू करण्यासाठी माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार यांची दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी अधिकृत मान्यता मिळवली. या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर सुरू करण्यात आलेल्या पोस्टवर अनेकांनी शुभेच्छा दिल्या; मात्र बालाजी शिरसाट यांनी त्या पोस्टवर अपमानास्पद व चिथावणीखोर टिप्पण्या करत साप्ताहिक व पत्रकारितेची खिल्ली उडवल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ मानली जाते. अशा पवित्र क्षेत्राचा अवमान करून समाजात चुकीचा संदेश देण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत, संबंधित व्यक्तीवर कठोर व दंडात्मक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास तालुक्यातील संपादक, पत्रकार व पत्रकार संघटनांच्या वतीने सहाय्यक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

तक्रारीसोबत संबंधित सोशल मीडिया स्क्रीनशॉट जोडण्यात आले असून, पोलिसांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन दोषींवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी पत्रकार व नागरिकांमधून होत आहे.

## नफ्यावर कमी अन् गुणवत्तेवर जास्त लक्ष द्या

### पंतप्रधान मोदींचा विकसित भारतासाठी खासगी क्षेत्राला संदेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली –**अमेरिका आणि युरोपियन युनियनसोबतच्या व्यापार करारांनंतर तसेच केंद्रीय अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या पहिल्याच मुलाखतीत खासगी क्षेत्राला महत्त्वाचा संदेश दिला आहे. विकसित भारताच्या ध्येयासाठी उद्योगक्षेत्राने नफ्यापेक्षा गुणवत्ता आणि उत्पादकतेवर अधिक भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

पीटीआय वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत पंतप्रधान मोदी यांनी भारताच्या आगामी आर्थिक परिवर्तनात खासगी क्षेत्राची भूमिका निर्णायक ठरणार असल्याचे स्पष्ट केले. डिजिटल वाढ, संरक्षण आधुनिकीकरण आणि नवोन्मेष यावर भर देत मोठ्या गुंतवणुकीची गरज त्यांनी अधोरेखित केली.

भारतात उत्पादन, सेवा क्षेत्र आणि लघु व मध्यम उद्योगांत बळकटी आल्याने इतर देशांबरोबर व्यापार सहजरित्या वाटाघाटी करता आल्या. राजकीय स्थिरता आणि राजकीय अंदाजामुळे भारतातील गुंतवणूकदारांचा विश्वास पुन्हा निर्माण झाला आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

गल्फ कोऑपरेशन कौन्सिल या भारत आणि मध्य पूर्वेकडील सहा देशांच्या गटाने मुक्त व्यापार करारासाठी औपचारिकपणे वाटाघाटी सुरू करण्यासाठी आधीच अटींवर स्वाक्षरी केली आहे. यासह, सरकारने गेल्या काही वर्षांत तब्बल नऊ व्यापार करारांना अंतिम स्वरूप दिले आहे, ज्यामध्ये ३८ विकसित राष्ट्रांचा समावेश आहे, असं मोदी म्हणाले.

यंदाचा अर्थसंकल्प म्हणजे भारताला विकसित राष्ट्रात रुपांतरीत होण्याच्या तयारीचे संकेत देणारा आहे. आता नाही तर कधीच नाही, असा हा अर्थसंकल्प असून याच प्रेरणेतून निर्माण झालेला आम्ही तयार आहोत, असा हा क्षण आहे, असं मोदी म्हणाले.

बायोफार्मा, सेमीकंडक्टर, इलेक्ट्रॉनिक्स घटक उत्पादन, केमिकल पार्कसारख्या उद्योन्मुख क्षेत्रांमध्ये गुंतवणूक वाढवण्याचा अर्थसंकल्पात समावेश आहे. यामुळे भारताचं भविष्य बळकट होऊन नोकऱ्या आणि गुंतवणुकीला एक नवीन चालना मिळेल, असंही मोदी म्हणाले. सरकारने राष्ट्र उभारणी आणि आर्थिक बळकटीकरणाच्या मार्गदर्शनाखाली एक समावेशक, तंत्रज्ञानचलित परंतु मानव केंद्रित कल्याणकारी वास्तुकला तयार केली आहे, जी शेवटपर्यंत पोहचत आहे, असंही मोदींनी स्पष्ट केलं.

मागील यूपीए सरकारवर टीका करताना पंतप्रधानांनी असा आरोप केला की आर्थिक गैरव्यवस्थापनामुळे भारताची वाटाघाटी करण्याची क्षमता कमकुवत झाली होती.''यूपीएच्या राजवटीत, वाटाघाटी सुरू व्हायच्या आणि नंतर तुटायच्या; दीर्घ वाटाघाटी करूनही फारसे खरे निष्कर्ष निघत नव्हते'', असं मोदी म्हणाले. ''विकसित भारतची पुढील झेप खाजगी क्षेत्राकडून नवोन्मेष, दीर्घकालीन क्षमता आणि जागतिक स्पर्धात्मकतेमध्ये धाडसी गुंतवणुकीवर अवलंबून असेल'', असंही त्यांनी सांगितलं.

## आमच्या पक्षाकडे शरद पवारांचं नेतृत्व, स्वतंत्र अस्तित्व पण कधीही वेळ पडल्यास सुनेत्रा पवारांच्या मदतील जाऊ-जयंत पाटील

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई–** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राजकीय वर्तुळात अनेक घडामोडी घडल्या. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चांना उधाण आलं होतं. अजित पवार हयात असताना दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्र येण्याची चर्चा सुरु झाली होती. अजित पवार त्यासाठी आग्रही होते, असा दावा वारंवार शरद पवार गटाच्या नेत्यांकडून केला जात आहे. मात्र, अजित पवार गटाच्या प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांनी अशी कोणतीही चर्चा झाली नव्हती, असे सांगत हा दावा फेटाळून लावला होता. त्यानंतर आता या चर्चा आता थंड होताना दिसत आहेत. अशातच शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते आणि आमदार जयंत पाटील यांनी कधीही वेळ पडल्यास सुनेत्रा पवारांच्या मदतील जाऊ असं वक्तव्य केलं आहे.

राष्ट्रवादीच्या विलिनीकरणासंदर्भात जयंत पाटील यांनीही आता भाष्य करणं टाळलेलं आहे. विलिनीकरणावरती मला भाष्य करावसं वाटत नाही, असं जयंत पाटील म्हणालेत. शरद पवारांच्या नेतृत्वात आमचा पक्ष आहे. आमच्या पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व आहे. आमचा पक्ष त्या दृष्टीने वाटचाल करेल, असं जयंत पाटील म्हणालेत. तर आम्ही कधीही तुमच्या मदतीला येऊ असं सुनेत्रा पवारांना त्यांनी सांगितल्याचंही ते म्हणालेत. सोबतच सुनेत्रा पवार आणि पार्थ पवारांसमोर अडथळे किंवा प्रश्न निर्माण करण्याची इच्छा नाही असं वक्तव्यही जयंत पाटील यांनी केलेलं आहे. राजकारणामध्ये उद्या काय होईल ते आज सांगता येत नाही अशी अवस्था दादांच्या निधनानंतर अकस्मित जे एक्सीडेंट झाला त्यानंतर हे पुन्हा एकदा सिद्ध झालेलं आहे की, आजचा दिवस, उद्या आहे का, हे नियतीला मान्य आहे का, असे अनेक प्रश्न आहेत. त्यामुळे पुढं काय करायचं आमचा पक्ष आहे, पक्षाच अस्तित्व आहे, पवार साहेबांच्या सारखं मोठं व्यक्तिमत्व आहे, महाराष्ट्रात अनेक प्रश्न आहेत, शेतकऱ्यांच्या समोर अमेरिका भारत कराराच्यातन काही नवीन आव्हान निर्माण होणार आहेत, देशाच्या आर्थिक परिस्थितीचे विषय आहेत, आणखीन बरेच प्रश्न आहेत, त्यामुळे आमचा पक्ष त्या दृष्टीने विचार करेल, पण प्रश्न विलिनीकरणाचा राहिला तर त्यावर मला आज भाष्य करायचा अधिकारी नाही, आणि भाष्य करावं असंही मला वाटत नाही.

सुनील तटकरे यांचं जे काही म्हणणं आहे, ते खोडून काढलं की अशी काही विलनीकरणाची चर्चा झालेलीच नव्हती, असं सुनील तटकरे म्हणतात. त्यावरती पाटील म्हणाले, ठीक आहे. आता ज्या माणसाशी, नेत्याशी आमची चर्चा झालेली, तेच नसल्यामुळे अशा विधानाला उत्तर देणही मला आवश्यक वाटत नाही, आता सुनेत्रा वहिनींना आम्ही काही चार पाच जण त्या बारामतीत असताना घरी जाऊन भेटलो आणि आम्ही त्यांना सांगितलं, काही अडचण असेल काही प्रश्न असतील तर आम्हाला सांगा. आम्ही कधी तुमच्या मदतीला येऊ, काहीच अडचण मनात किंतु बाळगू नका, विलिनीकरणाच्या आधी देखील एकदा दोनदा माझ्या त्यांच्या भेटी झालेल्या होत्या, त्यामुळे सुनेत्रा वहिनींचा जो मुद्दा असेल किंवा पार्थ पवारांचा असेल आमची त्यांना पूर्ण पाठिंबा म्हणजे सपोर्ट आहे, त्यांच्यासाठी काही अडथळे आणि प्रश्न तयार करण्याची आमची इच्छा नाही, असंही जयंत पाटील यांनी म्हटलं आहे.

## राज्यभरात एटीएसकडून धाडींचे सत्र; यवतमाळमध्ये १४ तर अहिल्यानगरमध्ये ७ ठिकाणी छापेमारी; पोलिसांचा मोठा बंदोबस्त

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई–** राज्यभरात सध्या सुरु असलेल्या एटीएसच्या कारवाईमुळे मोठी खळबळ उडाली आहे. अशातच विदर्भातील यवतमाळमध्ये पुसद आणि उमरखेडमध्ये १४ ठिकाणी छापेमारी करण्यात आली आहे. तर अहिल्यानगरमध्ये ७ ठिकाणी एटीएसचे छापे पडल्याची माहिती आहे. दहशतवादी संघटनांच्या संपर्कात राहून अनेक तरुणांना सक्रिय करण्याच्या हालचाली आढळल्यानंतर एटीएसनं सर्च ऑपरेशन राबवलं आहे. त्या अनुषंगाने अनेक भागात जवळपास २१ ठिकाणी एटीएसचे सकाळपासून सर्च ऑपरेशन सुरु असल्याची माहीती आहे. सोबतच या प्रकरणी अनेकांना ताब्यात घेऊन चौकशी केली जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.




राज्यात काल रात्रीपासून अनेक भागात एटीएसची गोपनीय कारवाई सुरुये. विदर्भातही ४ ते ५ ठिकाणी एटीएस पथकाने कारवाई सुरू केली आहे. यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड आणि पुसद गावात एटीएस पथकाची काल रात्रीपासून कारवाई सुरु आहे. तर अकोला जिल्ह्यातील उरळ पोलीस स्टेशनअंतर्गत काही भागातही कारवाई सुरू आहे. एटीएसचे २० पथक हे रात्रीपासून उमरखेड आणि पुसद गावात तळ ठोकून आहे. एटीएस प्रमुख चंद्रकिशोर मीणा यांच्या नेतृत्वात विविध पथके तयार करण्यात आले असून राज्यात अनेक ठिकाणी काल रात्रीपासून हे पथके तळ ठोकून आहेत. एकट्या यवतमाळ जिल्ह्यात जवळपास एटीएस २० पथक दाखल आहे. या ठिकाणी स्थानिक पोलिसांसह आयपीएस अधिकारी देखील हजर आहे. त्यामुळे या कारवाईत नेमकं काय घडतं हे पाहणं महत्वचे ठरणार आहे.

अत्यंत गोपनीय पद्धतीनं राज्यातल्या अनेक ठिकाणी एटीएस पथकाकडून चौकशी सुरु आहे. स्थानिक घरांमध्ये जात लोकांकडून चौकशी केल्या जात आहे. मात्र कारवाईत पथकाने अद्यापपर्यंत कुणालाही ताब्यात घेतले नाही, अशी माहिती सूत्रांनी दिलीये. संभाव्य घातपाती कारवायांच्या पार्श्वभूमीवर एटीएससह तपास यंत्रणांनी काल मध्यरात्रीपासून राज्यात बहुतांश जिल्ह्यातीळ विविध परिसरात कारवाईला सुरुवात केलीय. कारवाई सुरू असताना यावेळी मोठा बंदोबस्त ठेवला जात आहे.

## वांद्र्यात सर्वात प्रदूषित हवेची नोंद प्रदूषणात वाढ, धुरकट वातावरणही कायम

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** मागील अनेक दिवसांपासून मुंबईतील हवेची गुणवत्ता खालावली आहे. यामुळे सातत्याने शहराचा सरासरी हवा गुणवत्ता निर्देशांक 'मध्यम' श्रेणीत नोंदला जातो. रविवारीही शहराचा सरासरी हवा गुणवत्ता निर्देशांक १३५ म्हणजेच 'मध्यम' श्रेणीत नोंदला गेला. तर वांद्रे पूर्व येथील खेरवाडी परिसरात शहरातील सर्वात प्रदूषित हवेची नोंद झाली.

मागील दोन ते तीन महिन्यांपासून शहर आणि उपनगरातील अनेक भागातील हवा 'मध्यम' श्रेणीत नोंदली जात आहे. शहरात धुरकट वातावरणही कायम असून यामुळे दृश्यमानता कमी झाली आहे. नैसर्गिक कारणांसह अनेक मानवनिर्मित कारणांमुळेही हवा प्रदूषणात वाढ होत आहे. 'समीर ॲप'च्या नोंदीनुसार, रविवारी शहरातील आणि उपनगरातील बहुतांश भागात हवेची गुणवत्ता 'मध्यम' श्रेणीत नोंदली गेली.

वांद्रेतील खेरवाडी परिसरात सकाळपासूनच हवेचा दर्जा खालावला होता. सायंकाळी तेथील हवा गुणवत्ता निर्देशांक २११ इतका म्हणजेच 'वाईट' नोंदला गेला. तेथील हवेत आरोग्यास हानिकारक असणाऱ्या 'पीएम २.५' आणि 'पीएम १०'चे प्रमाण सर्वाधिक होते. दरम्यान, रविवारी केवळ पवई, मुलुंड पूर्व, भांडुप पश्चिम आणि बोरिवली पूर्व येथील हवाच 'समाधानकारक' श्रेणीत नोंदली गेली. मुंबईसह कोकण पट्ट्यातील काही भागांत मागील काही दिवसांपासून कमाल तापमानात वाढ होत आहे. यामुळे उकाड्यातही वाढ झाली आहे. रविवारी हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात ३३ अंश सेल्सिअस तर सांताक्रूझ केंद्रात ३५.२ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. सोमवारीही कमाल तापमान ३४ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २१ अंश सेल्सिअस इतके राहील, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

# कुछ तो लोग कहेंगे... लोगोंकाकाम है कहेना...

तुम्हाला ही गोष्ट नक्कीच ठाऊक आहे. एक धोबी आणि त्याचा मुलगा शहरातल्या आठवड्याच्या बाजारात गाढव खरेदी करायला गेले. येताना सटरफटर अशी इतरही बरीच खरेदी झाली. त्या वजनाची थैली मुलाने डोक्यावर घेतली आणि बापाने गाढवाच्या गळ्यातली दोरी धरून चालायला सुरुवात केली. दुपार झाली होती. अंगातून घामाच्या धारा निथळत होत्या. दोघंही पार थकले होते. वाटेत एकजण ओळखीचा भेटला नि म्हणाला, 'एवढं गाढव असून तुम्ही दोघं पायी चालताय...? तुम्हीच खरे गाढव आहात...' बाप मुलाला म्हणाला, 'तू सामान घेऊन गाढवावर बस. मी चालतो.'त्यांना तसं चालताना पाहून आणखी दोन जण म्हणाले. 'काय दिवस आलेत? तरणाताठा मुलगा गाढवावर बसलाय आणि म्हातारा बाप पायी चालतोय.'मुलगा उतरला आणि बाप गाढवावर बसला. आता लोक म्हणू लागले. 'बाप एकटाच आरामात बसलाय. पोरगा बिचारा चालतोय... चालतोय.'त्यानंतर दोघेही गाढवावर बसले तर लोक म्हणू लागले 'की काय माज आलाय बाप-लेकाला... त्या मुक्या प्राण्यावर दोघं-दोघं बसलेत. त्या बिचाऱ्या गाढवाचे किती हाल होताहेत...'अखेरीस लोकांच्या या उलटसुलट बोलण्याला कंटाळून त्या बापलेकांनी गाढवाला आडवा पाडून त्याच्या पायाला लांब बांबू बांधला आणि त्याला उलटा उचलून घेऊन चालायला सुरुवात केली. गाढवाची ही अजब यात्रा पाहून आजूबाजूचे खूपसारे लोक गोळा झाले. शिट्या टाळ्या वाजवू लागले. गाढव बिथरलं. पाय झाडू लागलं. एव्हाना ही पालखी नदीवरच्या पुलावरून चालली होती. गाढवाने पाय झाडून बांधलेल्या दोऱ्या तोडल्या आणि त्या गडबडीत गाढव नदीत पडलं. वाहून गेलं. रिकामा पोकळ बांबू घेऊन बापलेक घरी परतले. आमच्या शाळेच्या क्रमिक पुस्तकात आम्हाला ही गोष्ट होती. माझ्या जवळच्या एका मित्राची विवाहित मुलगी लग्नापूर्वी गाणं शिकली होती. लग्नानंतर मात्र तिचं गाणं बंद पडलं, पण अलीकडेच तिला तिच्या क्लासमधल्या सरांनी बोलावून घेतलं आणि तिच्या आवाजात काही गाणी रेकॉर्ड केली. त्यानंतर तिची अमेरिकेतील एका शोसाठी निवड देखील झाली. पण तिनं ती संधी नाकारली. कारण काय तर म्हणे तिच्या म्हाताऱ्या सासू-सासऱ्यांकडे बघायला कोणी नव्हतं. थोरली जाऊबाई नोकरी करणारी होती. धाकटी नणंद कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला होती. अशा अनेक अडचणींचे अडथळे मार्गात उभे राहिले. अशावेळी नवऱ्यानं थोडं प्रोत्साहन द्यायला हवं होतं. सासू-सासऱ्यांनी देखील थोडा समजूतदारपणा दाखवायला हवा होता. पण... पण जवळच्या नातेवाइकांनी तिचे पायच ओढले. 'तू काय स्वतःला लता मंगेशकर समजतेस की आशा भोसले?' बिचारी हिरमुसली आणि स्वतःच्या मनापेक्षा जनांचं ऐकून गप्प बसली. अशी अनेक उदाहरणं आपल्याला आजूबाजूला दिसतील. एवढंच कशाला आपणदेखील असेच लोकांचा विचार करूनच वागतो. आजूबाजूचे चार लोक काय म्हणतील याचा विचार करून स्वतःचा आतला आवाज दाबून टाकतो. आणखी एक घटना सांगतो. दहा वर्षांपूर्वी माझ्या एक नातेवाईक बाईचा नवरा अपघातात अचानक गेला. नवरा गेला त्यावेळी त्या बाईंनी नुकतीच साठी ओलांडली होती. दोन्ही मुलं परदेशात स्थायिक, अशावेळी तिच्याच परिचयातील एका गृहस्थानी सहा महिन्यांनंतर तिला चक्क लग्नासाठी विचारलं. ते देखील साधारण तिच्याच वयाचे. त्यांचीही पहिली पत्नी दीर्घ आजारानंतर वारली होती. ते मुंबईत एकटेच राहात होते. विवाहित मुलगी बंगलोरला आयटी कंपनीत होती. मुलीनंच पुढाकार घेतला आणि या बाईना आपल्या वडिलांबरोबर लगाबद्दल विचारलं... त्या बाईंनादेखील हा प्रस्ताव मनातून पटत होता. उरलेलं आयुष्य एकाकी काढण्यापेक्षा परिचयातलाच माणूस जर सहचारी म्हणून लाभला तर आयुष्याच्या उत्तरायणातील सहजीवन नक्की सुखावह होईल हे त्या बाईंनादेखील पटत होतं. त्या गृहस्थांच्या मुलीनं खूप समजावलं. मीदेखील त्यांच्याशी बोललो. पण... पण... 'या वयात लग्न...? लोक काय म्हणतील...?' 'ज्या वयात केसांना मेहंदी लावायची त्या वयात हाताला मेहंदी लावणं शोभेल का?' असा विचार करून त्या बाईनी नकार दिला... त्यानंतर त्या गृहस्थांनी त्यांच्याच ओळखीच्या दुसऱ्या एका स्त्रीशी विवाह केल्याचं समजलं, आता या घटनेला बरीच वर्षे होऊन गेली आहेत. अलीकडे एका समारंभात त्या बाई मला भेटल्या. बोलता बोलता त्यांनी 'जनांचं ऐकून स्वतःच्या नाकारल्याबद्दल' अत्यंत प्रांजळपणे कबुली दिली. त्यावेळी त्यांच्या डोळ्यांत अश्रू दाटून आले होते... तुमच्या पाहण्यात, ऐकण्यातदेखील अशा प्रकारची काही उदाहरणं आढळतील. एखाद-दुसरं उदाहरण तर कदाचित आपल्याच आयुष्यातलंदेखील असेल. खरंय ना? म्हणूनच हिंदीत एक म्हण आहे. 'सबसे बड़ा रोग... क्या कहेंगे लोग?' लोक काय म्हणतील? त्यांना काय वाटेल? केवळ लोकांच्या मनाचाच विचार केल्यामुळे आपल्या स्वतःच्या मनाची विचार करण्याची शक्तीच हळूहळू हरवून जाते. स्वतःचं मन स्वतःच्या ताब्यात न राहता इतरांच्या ताब्यात जातं. विचार परावलंबी होतात... आयुष्य प्रवाहपतित होतं. आपण लोकांच्या विचारांबरोबर भरकटत वाहत जातो. वास्तविक खरं तर लोकांना कशाचंच सोयरसुतक नसतं. त्यांना केवळ बोलायचं तेवढंच ठाऊक असतं. बोलणारे लोक कधीही मदतीला धावून येत नाहीत आणि मदत करणारे कधीही समोरच्याचं मन खची होऊ देत नाहीत...बोलणारे लोक बोलले तरी ते किती दिवस बोलतील...? दोन दिवस... चार दिवस... बस्स... त्यानंतर त्यांना दुसऱ्या कुणाचा तरी नवीन विषय सापडतो आणि ते त्याच्यावर बोलतात... आपण मात्र हाताशी आलेली चांगली संधी गमावून बसतो. याच पार्श्वभूमीवर आजची कविता. कवी आहेत आपल्या सगळ्यांच्या परिचयाचे. भा रा तांबे आणि कविता देखील सगळ्यांच्या परिचयाचीच आहे. जन पळभर म्हणतील हाय हाय... म्हणूनच कोणतंही काम करताना आपल्या मनाचा कौल घ्यायचा. लोकांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून फक्त आतला आवाज ऐकायचा... हा ज्यांनी लोकांचा विचार न करता फक्त आतला आवाज ज्यांनी ऐकला त्यांनी इतिहास घडवल्याची अनेक उदाहरणं आहेत. आनंदीबाई जोशी... लोक काय म्हणतील याची पर्वा न बाळगता नेटानं शिकल्या. डॉक्टर झाल्या. इतरांसारखी नोकरी एके नोकरी नाकारून स्वतःच्या मनाचा कौल घेणारे धीरुभाई अंबानी. 'विधवेसोबत लग्न केलं तर लोक काय म्हणतील?' असा विचार न करणारे महर्षी धोंडो केशव कर्वे. स्त्रीयांच्या शिक्षणासाठी तत्कालिन समाजाशी लढणारे महात्मा जोतिबा फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले. या सगळ्यांनी फक्त स्वतःच्या मनाचा कौल घेतला... आणि जिद्दीनं इतिहास निर्माण केला. लोक बोलतील... फक्त बोलतील... त्यांच्या मनाचा विचार करून आपल्या आयुष्यातील आनंदाच्या संधी कधीच दवडायच्या नाहीत. अखेरीस इतकंच सांगतो की, आपल्या आयुष्यात असा प्रसंग आला तर भारा तांबेंची 'जन पळभर म्हणतील हाय हाय' ही कविता आठवायची आणि त्याचबरोबर हिंदीतल्या गाण्याचे शब्ददेखील आठवायचे.


कुछ तो लोग कहेंगे... लोगोंकाकाम है कहेना...

# एपस्टीन फाईल्स : सत्तेच्या सावल्यांतील सत्याचा शोध

जगात लोकशाही, मानवी हक्क आणि न्यायव्यवस्थेच्या उच्च मूल्यांबद्दल मोठमोठ्या घोषणा केल्या जातात; परंतु काही प्रकरणे अशी असतात की ती या सर्व मूल्यांच्या पायावरच प्रश्नचिन्ह उभे करतात. ''एपस्टीन फाईल्स'' हे असेच एक प्रकरण आहे, जे केवळ एका व्यक्तीच्या गुन्ह्यांपुरते मर्यादित नसून, सत्ता, पैसा, प्रभाव आणि गुप्त संगनमत यांच्या गुंतागुंतीच्या जाळ्याकडे बोट दाखवते. हे प्रकरण आपल्याला विचारायला भाग पाडते की कायद्यापुढे सर्व समान आहेत का, की काहींचे हात इतके लांब असतात की ते न्यायालाही वाकवू शकतात? जेफ्री एपस्टीन हा अमेरिकन वित्तव्यवसायिक म्हणून ओळखला जात असला तरी त्याचे नाव जगभरात अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषणाच्या आरोपांमुळे कुप्रसिद्ध झाले. त्याच्या संपर्कात अनेक प्रभावशाली राजकारणी, उद्योगपती, सेलिब्रिटी आणि सत्ताधारी मंडळी असल्याचे आरोप आणि दस्तऐवज समोर आले. त्याच्या खाजगी विमान प्रवासाच्या नोंदी, भेटीगाठींचे रेकॉर्ड, न्यायालयीन कागदपत्रे आणि साक्षीदारांचे जबाब, या सर्वांचा एकत्रित उल्लेख म्हणजेच ''एपस्टीन फाईल्स''. हे प्रकरण केवळ एका गुन्हेगाराच्या कृत्यांवर पडदा टाकत नाही, तर एक मोठा प्रश्न विचारते, सत्ताधाऱ्यांच्या वर्तुळात प्रवेश मिळाला की कायद्याचे दात बोथट होतात का?

एपस्टीन प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे त्याने अनेक वर्षे संशयाच्या भोवऱ्यात राहूनही प्रभावशाली संबंधांच्या जोरावर स्वतःला वाचवले. गंभीर आरोप असूनही त्याच्यावर कारवाई उशिरा झाली, शिक्षा सौम्य झाली आणि तपासात अनेक पोकळ्या राहिल्या. यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे. जेव्हा फाईल्समधून मोठमोठी नावे पुढे येऊ लागली, तेव्हा जगभरात खळबळ उडाली. समाजाने असा प्रश्न विचारला जर सामान्य व्यक्ती असती, तर न्यायप्रक्रिया इतकी संथ राहिली असती का? की तिला आधीच कठोर शिक्षा झाली असती? या प्रकरणात माध्यमांची भूमिका देखील तपासली गेली. काही पत्रकारांनी जीवाची बाजी लावून तपास पत्रकारिता केली, पीडितांचे आवाज पुढे आणले आणि बंद दरवाज्यांमागचे व्यवहार उघड केले. परंतु त्याचवेळी काही माध्यमसंस्थांवर आरोप झाले की त्यांनी प्रभावशाली लोकांच्या दबावामुळे बातम्या दाबून ठेवल्या.

पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ मानली जाते. जर हा स्तंभच दबावाखाली वाकला, तर सत्याचा आवाज कुठे ऐकू येणार? एपस्टीन




फाईल्सने माध्यमविश्वालाही आत्मपरीक्षण करायला भाग पाडले आहे. या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा आणि संवेदनशील भाग म्हणजे पीडित मुली व महिला. अनेकांनी वर्षानुवर्षे भीती, दबाव आणि सामाजिक कलंक सहन करत आपले अनुभव मांडले. त्यांचे म्हणणे होते, गुन्हा फक्त एका व्यक्तीने केला नाही, तर एक संपूर्ण व्यवस्था त्याला संरक्षण देत होती. न्यायालयीन प्रक्रियेत नावं, तारखा, ठिकाणं चर्चेत येतात; पण त्या मागे असतात तुटलेल्या आयुष्यांच्या कथा. एपस्टीन फाईल्स हे केवळ दस्तऐवज नाहीत, त्या असंख्य वेदनांच्या साक्षी आहेत. न्याय म्हणजे केवळ शिक्षा नव्हे; तर पीडितांचा सन्मान, पुनर्वसन आणि सत्याची अधिकृत कबुलीही आहे.

या प्रकरणाने एक भीषण वास्तव दाखवले सत्ता, पैसा आणि संपर्क यांचे जाळे इतके घट्ट असू शकते की ते कायद्यालाही गोंधळात टाकू शकते. जेव्हा उच्चभ्रू वर्तुळात गुन्हे लपवले जातात, तेव्हा लोकशाही कमकुवत होते. कारण लोकशाहीचा पाया आहे पारदर्शकता आणि उत्तरदायित्व. एपस्टीन फाईल्स हा जगातील सर्व लोकशाही व्यवस्थांसाठी एक इशारा आहे. कायद्याची पकड सर्वांवर समान असली पाहिजे. अन्यथा ''कायदा सर्वांसाठी समान'' हे वाक्य फक्त घोषवाक्य राहते. या प्रकरणाभोवती अनेक षड्यंत्र सिद्धांतही फिरतात. गुप्त नेटवर्क, राजकीय सौदे, रहस्यमय मृत्यू, दडपलेले पुरावे. सोशल मीडियाच्या युगात अफवा आणि तथ्य यांची सरमिसळ वेगाने होते. त्यामुळे जबाबदार तपास, अधिकृत कागदपत्रे आणि न्यायालयीन निष्कर्ष यांना अधिक महत्त्व प्राप्त होते.

समाजाने अंधविश्वास आणि अफवांपासून दूर राहून पुराव्यावर आधारित चर्चा करणे आवश्यक आहे. अन्यथा सत्याचा शोध गोंधळात हरवतो. एपस्टीन फाईल्स हे अमेरिकेतील प्रकरण असले तरी त्यातील धडे सार्वत्रिक आहेत. कोणत्याही देशात, कोणत्याही व्यवस्थेत जर प्रभावशाली लोकांना कायद्यापेक्षा वर मानले गेले, तर सामान्य नागरिकांचा न्यायावरील विश्वास डळमळतो. भारतातही अनेकदा प्रभाव, पैसा आणि राजकीय पाठबळामुळे तपासाच्या दिशांवर प्रश्न उपस्थित होतात. म्हणूनच तपास यंत्रणांची स्वायत्तता, न्यायव्यवस्थेची पारदर्शकता आणि माध्यमांची निर्भयता, हे तीन स्तंभ मजबूत ठेवणे अत्यावश्यक आहे. एपस्टीन फाईल्समधील सर्व सत्य कधी पूर्णपणे बाहेर येईल का, हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. काही कागदपत्रे सार्वजनिक झाली, काही नावे समोर आली; परंतु अनेक धागे अजूनही अंधारात असल्याची भावना कायम आहे. न्याय केवळ न्यायालयीन निर्णयाने पूर्ण होत नाही; तो समाजाच्या विश्वासातून पूर्ण होतो. सत्तेच्या सावल्यांत लपलेले सत्य बाहेर आणण्यासाठी धैर्यवान पत्रकार, प्रामाणिक तपास अधिकारी, स्वतंत्र न्यायव्यवस्था आणि जागरूक समाज, या चौघांची गरज असते. एपस्टीन फाईल्सने जगाला धक्का दिला आहे; आता हा धक्का जागृतीत बदलणे आपल्याच हातात आहे. कारण शेवटी, लोकशाही टिकते ती घोषणांनी नव्हे तर निर्भय सत्यशोधाने.

**– प्रवीण बागडे**
नागपूर

# मेरे टूटे हुए दिलसे, कोई तो आज ये पुछे...

ज्याने आयुष्यात एकदा तरी 'गाण्याच्या भेंड्या' हा खेळ खेळला आहे त्या प्रत्येकाला 'छलीया'मधील एक गाणे नक्कीच माहीत असते 'डम डम डिगा डिगा, मौसम भीगा भीगा, बिन पिये मै तो गिरा, मैं तो गिरा, हाय अल्ला, सुरत आपकी सुभानअल्ला!...'

कारण 'ड' आल्यावर पहिल्या फेरीत याच गाण्याने आपली सुटका केलेली असते. (अशीच 'छ' आल्यावर याच सिनेमातील 'छलीया मेरा नाम'ने प्रत्येकाला भेंडीपासून वाचवलेले असते.) कदाचित कल्याणजी आनंदजींच्या ठेकेबाज चालीमुळेही असेल पण ही गाणी सर्वांना माहीत असतातच. राजकपूरच्या सुरुवातीच्या काळात चार्ली चॅपलीनची नक्कल करायच्या सवयीमुळे साधाभोळा स्वभाव, गरिबी आणि मनाचा मोठेपणा ही त्याच्या बहुतेक पात्रांची वैशिष्ट्ये असायची. म्हणूनच 'डम डम डिगा डिगा'मध्ये जां निसार अख्तर यांनी गरिबीचा आणि तदनुषंगिक फिल्मी 'बड्या दिला'चाही उल्लेख टाकला –

''सनम हम माना, गरीब है, नसीबा खोटा सही, बंदा छोटा सही, दिल ये खज़ाना है प्यारका, हाए अल्ला, सूरत आपकी सुभान अल्ला.'''छलीया' हा १९६०ला आलेला मनमोहन देसाईंचा पहिला सिनेमा! राजकपूर आणि नूतनबरोबर प्राण, रहमान आणि शोभना समर्थ होते. फियोदोर दोस्तोव्हस्कीच्या 'व्हाईट नाईटस' या लघुकथेवर बेतलेल्या कथानकाला मनमोहनजींनी भारताच्या फाळणीची पार्श्वभूमी दिली.

लाहोरमधील शांतीचे (नूतन) लग्न ऐन फाळणीच्यावेळी केवलशी (रहमान) होते. लग्नानंतर दोन्ही कुटुंबांना लाहोर सोडून दिल्लीला यावे लागते. फाळणीच्या भयानक परिस्थितीत झालेल्या चुकामुकीमुळे शांतीला अब्दुल रहमानच्या (प्राण) घरी राहावे लागते. काही वर्षांनी शांतीला भारतात येणे शक्य होते तेव्हा पती 'केवल' मोकळ्या मनाने तिचे स्वागत करतो पण तो मुलाला त्याचे नाव विचारतो तेव्हा मुलगा सांगतो, 'अन्वर'! केवलला हा पहिला धक्का! वडिलांचे नाव विचारल्यावर तो सांगतो, अब्दुल रहमान! झाले! सगळे वातावरण क्षणात बिघडते.

पतीने घराबाहेर काढलेल्या शांतीला तिचे वडीलही घरात घेत नाहीत. टोकाची निराश झालेली शांती आत्महत्येचा प्रयत्न करते तेव्हा तिथे असलेला राजकपूर (छलीया) तिला वाचवतो. पुढे सहवासाने त्याच्या मनात तिच्याविषयी प्रेम निर्माण होते. मात्र तिची खरी कहाणी समजल्यावर दिलदार छलीया तिच्यात आणि तिच्या दुरावलेल्या पतीत दिलजमाई घडवून आणतो आणि एकटाच तिच्या जीवनातून निघून जातो अशी ही कथा! कल्याणजी-आनंदजींनी समरसून संगीत दिलेली बहुतेक गाणी लोकप्रिय झाली. समीक्षकांच्या मते छलीयाच्या यशात कल्याणजी आनंदजींच्या संगीताचा मोठा वाटा होता.

छलीया चांगला चालला. राजकपूरला 'सर्वोत्कृष्ट अभिनेता' म्हणून आणि नूतनला 'सर्वोत्कृष्ट अभिनेत्री' म्हणून फिल्मफेयर नामांकनही मिळाले. पण छलीयाच्या यशामुळे मनमोहन देसाईना जणू एक फॉर्म्युलाच सापडला. पुढे त्यांच्या सिनेमातली पात्रे सिनेमाच्या पूर्वार्धात नियमितपणे हरवू लागली आणि उत्तरार्धात सापडू लागली! उदाहरणच द्यायचे झाल्यास रांगेत आहेत 'अमर अकबर अँथोनी'(१९७७), 'धरमवीर'(१९७७),'नसीब'(१९८१),'कुली'(१९८३),'रामपूरका लक्ष्मण'(१९७२) इत्यादी इत्यादी.

जिचे प्राण वाचवले त्या नूतनवर राज कपूरचे मनापासून प्रेम बसले आहे. पण त्याची ते व्यक्त करायची हिंमत होत नाही. एकदा तो तिला देवळात भेटतो. तेव्हा भावना अनावर होऊन आपले प्रेम सूचित करतो. ती विवाहित आहे आणि तिला एक मुलगा आहे हे त्याला माहीत नसते. पतीकडे परत जावून आपल्या संसार पुन्हा उभा करायची उत्कट इच्छा असलेली शांती त्याला स्पष्ट नकार देते. त्यावेळी आतून पूर्णपणे तुटलेल्या छलीयाच्या तोंडी जां निसार अख्तरसाहेबांनी एक गाणे दिले होते.

कुणाही अगतिक आणि हरलेल्या प्रेमिकाची भावना व्यक्त करणारे, त्याच्या भाबड्या भावना व्यक्त करणारे अख्तरसाहेबांचे शब्द होते – 'मेरे टूटे हुए दिलसे, कोई तो



आज ये पूछे. के तेरा हाल क्या है, मेरे टूटे हुए दिलसे...'

माणूस प्रेमात हरल्यावर मनातून प्रचंड एकटा बनलेला असतो. त्याला स्वत:हून कुणाशी बोलावेसेही वाटत नसते. पण त्या विमनस्क अवस्थेत कुणी नुसती सहानुभूती दाखवली तरी त्याला केवढा तरी दिलासा मिळतो. पण छलीयाला असे कुणीही जवळचे नाही. कसेबसे कुणीतरी जवळचे वाटू लागले होते तेही नुसते प्रेम व्यक्त केल्याने आता कायमचे दूर जाणार हे पाहून त्याच्या मनाची घालमेल होते. नियतीला दोष देताना म्हणतो, 'कधी नव्हे ते माझ्या जीवनाच्या शुष्क वेलीवर प्रेमाचे एक फूल उमलत होते. तू निर्दयपणे ती फांदीच तोडून टाकलीस ना?

'किस्मत तेरी रीत निराली, ओ छलिये, ओ छलनेवाली. फूल खिला तो टूटी डाली...' तो इतका निर्मळ मनाचा आहे की तो सगळ्या शोकांतिकेचा दोष स्वत:लाच देतो. माझ्या नजरेची चूक झाली, मी तिच्या वागण्याचा चुकीचा अर्थ काढला, तिच्या चांगुलपणाला प्रेम समजून बसलो यात तिचा काय दोष? असे तो स्वत:लाच विचारतो – 'जिसे उल्फत समझ बैठा, मेरी नज़रोंका धोखा था. किसीकी क्या खता है, मेरे टूटे हुए दिलसे...'

अगदी एकटेपणाचे, उजाड, उदास जगणे नशिबी आलेल्या छलीयाच्या जीवनात शांतीच्या परिचयामुळे प्रेमाची शक्यता निर्माण झाली असते पण पहिल्याच प्रयत्नात त्याचे प्रेम नाकारले जाते, विफल होते. विमनस्क अवस्थेत त्याला वाटते, 'आधी एकटा होतो, ते किती बरे होते! निदान माझा मी स्वतंत्र तरी होतो, आता हे काय होऊन बसले... नाकारले गेलेले एकतर्फी प्रेम ही किती वेदनादायी भावना असते ते मला आता समजते आहे –

'मांगी मुहब्बत पाई जुदाई, दुनिया मुझको रास न आई. पहले क़दमपर ठोकर खाई, सदा आज़ाद रहते थे. हमें मालूम ही क्या था, मुहब्बत क्या बला है. मेरे टूटे हुए दिलसे...'

जुन्या काळी प्रेमाचे सफल होणे ही सिनेमातच नव्हे तर वास्तव जीवनातही फार दुर्मीळ गोष्ट होती. त्यामुळे शोकांतिकांशी लोक चटकन समरस होत. सिनेमातल्या एकेक प्रसंगाला, एकंदर कथानकाला अधिक उत्कट करणारी गाणी असत. अशी जुन्या गीतकारांनी समरसून लिहिलेली, भावनेने ओतप्रोत भरलेली गाणी, जाणकार संगीतकारांनी त्यांना दिलेले, मनात रेंगाळणारे संगीत, कलाकारांचा निरागस, सकस अभिनय हे सगळे मनाला एका वेगळाच आनंद देऊन जाते. म्हणून हा 'नॉस्टॅल्जिया'!

**– श्रीनिवास बेलसरे**

# शुभारंभ शुभदिनी, नव्या मराठी कलाकृतीसाठी मनवा नाईक आणि गौरी कालेलकर-चौधरी एकत्र

सर्जनशील मनं एकत्र आली की कलाकृतीला नवी उंची मिळते आणि असाच एक सुंदर योग आता मराठी मनोरंजन विश्वात घडतोय! निर्माते सिद्धेश चौधरी, गौरी कालेलकर-चौधरी आणि लेखिका-अभिनेत्री मनवा नाईक या पहिल्यांदाच एका नव्या मराठी चित्रपटासाठी एकत्र येत आहेत.

माघी गणेश जयंतीचा शुभमुहूर्त साधत, गणरायाच्या चरणी त्यांनी आपल्या आगामी कलाकृतीची मुहूर्तमेढ रोवली. शुभारंभ शुभदिनी हा क्षण त्यांच्या नव्या प्रवासाचा नवा अध्याय ठरणार आहे. 'मधुसूदन कालेलकर प्रोडक्शन्स'च्या बॅनरखालील ह्या आगामी मराठी चित्रपटाचे लेखन-दिग्दर्शन मनवा नाईक करणार आहेत. दमदार संहिता, ताजं कथानक आणि भक्कम टीमवर्कच्या जोरावर ही कलाकृती प्रेक्षकांसाठी खास पर्वणी ठरणार आहे. अभिनय, दिग्दर्शन, निर्मिती अशा वेगवेगळ्या क्षेत्रात काम करून मनवा हिने आजवर उत्तम कलाकृती दिल्या आहेत.

पोर बाजार या मराठी चित्रपटाचे दिग्दर्शन, चूक भूल द्यावी घ्यावी, सरस्वती या मालिकांची तसेच वेबसिरीजची निर्मिती केली आहे. 'नो एंट्री पुढे धोका आहे', 'जाऊ द्या ना बाळासाहेब, 'फक्त लढ म्हणा' यांसारख्या चित्रपटात तसेच हिंदी, मराठी मालिकांमध्ये तिने खूप चांगल्या भूमिका साकारल्या आहेत. 'मधुसूदन कालेलकर प्रोडक्शन्स'च्या निर्माती गौरी कालेलकर-चौधरी यांनी 'घरत गणपती' या गाजलेल्या मराठी चित्रपटासोबत 'एक तिची गोष्ट' या नृत्यनाटिकेची निर्मिती केली आहे.

या नव्या उपक्रमाबद्दल बोलताना गौरी कालेलकर-चौधरी म्हणाल्या, ''एक उत्तम संहिता माझ्याकडे आली आणि निर्माती म्हणून ती कलाकृती करावी असं मनापासून वाटलं. मनवा लेखिका-दिग्दर्शिका म्हणून माझ्यासोबत ठामपणे उभी राहिली. आमच्या टीमवर्कमधून रसिकांना एक दर्जेदार अनुभव





देण्याचा आम्हाला विश्वास आहे.'' ही नवीन कलाकृती मराठी प्रेक्षकांसाठी उत्सुकता वाढवणारी बातमी नक्कीच ठरणार आहे!

***

# महाशिवरात्री महोत्सवानिमित्त औंढा नागनाथ मंदिर येथे १६० ड्रोनचा नेत्रदीपक लेझर शो


## पर्यटक वृद्धीसाठी जिल्हा प्रशासनाचे विशेष प्रयत्न











**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली –** बारा ज्योतिर्लिंगांपैकी आठवे असलेल्या औंढा नागनाथ मंदिर येथे महाशिवरात्री महोत्सवानिमित्त १६० ड्रोनच्या भव्य लेझर शोचे आयोजन जिल्हा प्रशासन व मंदिर ट्रस्टच्या वतीने करण्यात आले. उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा हा ड्रोन लेझर शो भक्त निवास क्र. ३ येथील मैदानावर सादर करण्यात आला.

यावेळी आमदार संतोष बांगर, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, पोलीस अधीक्षक नीलभ रोहन, वसमतचे उपविभागीय अधिकारी विकास माने, हिंगोलीचे उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, सेनगाव नगर पंचायतीचे मुख्याधिकारी योगेशकुमार मीना तसेच तहसीलदार हरिष गाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

राज्याचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या नेतृत्वात जिल्ह्यात पर्यटनवाढीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून हा भव्य ड्रोन लेझर शो आयोजित करण्यात आला.

औंढा नागनाथ मंदिर येथे पर्यटक व भाविकांसाठी निवास व्यवस्था, पायाभूत सुविधा व विकासकामांसाठी २८८ कोटींपेक्षा अधिक निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, जिल्ह्याच्या पालक सचिव श्रीमती रिचा बागला या कामांचा सातत्याने आढावा घेत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा पर्यटनाच्या नकाशावर यावा व येथे पर्यटकांची संख्या वाढावी, यासाठी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता सातत्याने प्रयत्नशील आहेत. ऐतिहासिक ड्रोन लेझर शोच्या माध्यमातून जिल्ह्याची ओळख देशभर पोहोचविण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे.

यापूर्वी सोमनाथ मंदिर येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत अशा स्वरूपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर आज औंढा नागनाथ मंदिर येथे या शोचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिली.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या ड्रोन लेझर शोमुळे औंढा नागनाथ येथे येणाऱ्या भाविक व पर्यटकांची संख्या २५ लाखांवरून ५० लाखांपर्यंत वाढेल, असा विश्वास आमदार संतोष बांगर यांनी व्यक्त केला. या उपक्रमाचा व्यापक प्रचार व प्रसार करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी आमदार संतोष बांगर व जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी उपस्थित सर्व भाविकांना महाशिवरात्रीनिमित्त शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित पत्रकार बांधवांचा शाल व नागेश्वराची प्रतिमा देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## कै.अजित दादा पवार यांच्या आत्म्यास शांती लाभावी म्हणून देगलुरच्या सामाजिक कार्यकर्त्याची तिरुमला चरणी प्रार्थना



**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलुर** –महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री कै.अजित दादा पवार यांच्या आत्म्यास शांती लाभावी, या भावनेतून देगलुर येथील सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांनी आंध्रप्रदेशातील तिरुपती तिरुमला बालाजी येथे श्रद्धांजली अर्पण केली.सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांनी तिरुमला येथे सुमारे ३५५० पायऱ्या (अंदाजे १२ किलोमीटर अंतर) अवघ्या पाच तासांत पायी चढून भगवान तिरुपती तिरुमला बालाजी यांच्या चरणी नतमस्तक होत कै. अजित दादा पवार यांच्या आत्म्यास शांती लाभो, अशी प्रार्थना केली.

या पायी यात्रेद्वारे त्यांनी श्रद्धा,समर्पण आणि सामाजिक जाणीव यांचा आदर्श घालून दिला आहे. त्यांच्या या भावनिक व श्रद्धापूर्ण उपक्रमाबद्दल देगलुर परिसरातून कौतुक व्यक्त करण्यात येत असून अनेकांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.

## पैनगंगा नदी पात्रात अनोळखी पुरुषाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळला

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट** – किनवट शहरालगत वाहणाऱ्या पैनगंगा नदीच्या पात्रात खरबी शिवारातील भरकडे यांच्या शेताजवळ अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयोगटातील पुरुष जातीचे अनोळखी प्रेत अत्यंत कुजलेल्या अवस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. प्रेतावरील कपडे तसेच चेहरा आणि शरीर पूर्णपणे सडलेल्या अवस्थेत असल्यामुळे मृत व्यक्तीची ओळख पटवणे अशक्य झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच किनवट पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश कराड, पोलीस हेडकॉन्स्टेबल गजानन डुकरे व पोलीस कॉन्स्टेबल सदाशिव अनंतवार यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थितीची पाहणी केली. तपासादरम्यान सदर मृतदेह पोलीस ठाणे दराटी हद्दीत येत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांनी तत्काळ दराटी पोलीस ठाण्याशी संपर्क साधून पुढील कार्यवाहीबाबत सूचना दिल्या.

सदर मृतदेह नेमका कुणाचा आहे तसेच मृत्यूचे नेमके कारण काय आहे, याबाबतची माहिती दराटी पोलीस ठाण्याच्या पुढील तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.



## हिंगोली येथे राम कदम मित्रमंडळाच्या वतीने भव्य एलईडी टीव्हीवर क्रिकेट सामना भारतीयाच्या विजयाने फटाक्याची आतिषबाजी

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोली येथे युवासेना जिल्हाप्रमुख राम कदम मित्रमंडळाच्या वतीने भारत विरूद्ध पाकिस्तान हा सामना भव्य एलईडी टीव्हीवर दाखविण्यात आला पाकिस्तानचा ६१ धावांनी पराभव केल्यानंतर फटाक्याच्या आधी शिवाजीने हिंगोलीत सर्वत्र आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

हिंगोलीकरांचा उत्साह आणि क्रिकेटचं वेड लक्षात घेता, युवासेना शहरप्रमुख राम कदम यांच्या वतीने आज भारत विरुद्ध पाकिस्तान या महामुकाबल्याचा आनंद घेण्यासाठी रामलीला मैदानावर भव्य एलईडी स्क्रीनची सोय करण्यात आली होती या ऐतिहासिक मॅचचा आनंद मोठ्या पडद्यावर, सर्वांसोबत घेण्यासाठी अनेक क्रिकेट प्रेमींनी रामलीला मैदान, हिंगोली येथे गर्दी करून या सामन्याचा आनंद लुटला.

## स्वच्छता, दिवाबत्ती, व्यापारी संकुलाचे नामाकरण आणि दर्ग्याच्या जमीनीसंदर्भात कॉंग्रेस पक्षाकडून निवेदन

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर** – पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर शहरात स्वच्छता, दिवाबत्ती आणि सायरनची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने नगर परिषद प्रशासनाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच चमकुमढी व्यापारी संकुलास भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी कॉंग्रेस पक्षाची ठोस भूमिका घेण्यात आली आहे.

मुस्लिम बांधवांना रोजा काळात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने विशेष उपाययोजना कराव्यात, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. रमजान महिन्यात पहाटे 'सहरी'च्या वेळी नागरिकांना जाग येण्यासाठी सायरनची सुविधा उपलब्ध करून द्यावी, तसेच मशिदी परिसरात व मुख्य रस्त्यांवर स्वच्छता मोहीम राबवून दिवाबत्ती सुरळीत ठेवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच निवेदनात देगलूर येथील चमकुमढी व्यापारी संकुलास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे, अशी ठाम भूमिका कॉंग्रेस पक्षाने मांडली आहे. सामाजिक समता, बंधुता आणि संविधानिक मूल्यांचे प्रतीक म्हणून व्यापारी संकुलाला त्यांचे नाव देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.





तसेच शहरातील दर्ग्याशी संबंधित जमीन मूळ दर्गा संस्थेकडे हस्तांतरित करण्यात यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. धार्मिक स्थळांच्या व्यवस्थापनाबाबत पारदर्शकता व न्याय्य निर्णय व्हावा, यासाठी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा कॉंग्रेस नेत्यांनी व्यक्त केली.

यावेळी विरोधी पक्षाचे गटनेता मिरामोहिय्योद्दीन, स्विकृत सदस्य अविनाश निलमवार, नगरसेवक शत्रुघ्न वाघमारे, नगरसेवक लक्ष्मण कंधारकर, नगरसेवक मोहित्तोद्दीन रफाई, यांच्यासह कॉंग्रेस पक्षाचे नगरसेवक, पदाधिकारी व प्रमुख नेते उपस्थित होते. शहरातील सामाजिक सलोखा अबाधित ठेवत सर्व समाजघटकांच्या भावना लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, असा इशारा देखील देण्यात आला.

## श्री.गुरु विठ्ठलनाथ महाराज देवस्थान येथे महाशिवरात्री निमित्त महापुजा सोहळा व महाप्रसादाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**





**नांदेड/अर्धापूर** – श्री.क्षेत्र खाजाबंदेनवाज साहेब,गुरू जालीदंरनाथ देवस्थान गोपाळचावडी येथे श्री.गुरु विठ्ठलनाथ महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने ता.१४ फेब्रुवारी शणिवार रोजी महाशिवरात्री महापुजा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.याठिकाणी महिन्याच्या प्रत्येक अमावस्येला अखंड महापुजा आणि महाशिवरात्री निमित्त दर सोमवारी महापुजा कार्यक्रम होत असतात.आपल्या सर्वांना कळविण्यात अत्यंत आनंद होतो की, दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी श्री.गुरू विठ्ठलनाथ महाराज मंदिर देवस्थान गोपाळचावडी ता.जि. नांदेड येथे अखंड महाशिवरात्री मासा निमित्त दररोज पहाटे ४ ते ६ काकडा आरती हि श्री.संत गुरू दामुनाथ पिता विठ्ठलनाथ महाराज यांच्या शुभ हस्ते झाली.या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून श्री.महंत १०८ यदुबन (गोकुळबन) गुरू गंभीरबन महाराज कोलंबी,श्री.संत बाळगीर पंचमगीर रावसाहेब महाराज आळणी बुवा मठ संस्थान यांच्या शुभ हस्ते श्री.गुरू विठ्ठलनाथ महाराज यांच्या मुर्ती, पादुका व कलश पूजन संपन्न झाले. श्री.संत गुरू दामुनाथ विठ्ठलनाथ महाराज यांचा सत्कार श्री.हभप मंगनाळे महाराज वसरणी यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी गोविंद महाराज मुक्तेश्वर आश्रम नांदेड,श्री. गंगाधर रानवळकर आदि उपस्थिती होते.या महाशिवरात्री महापुजा कार्यक्रमास आलेल्या सर्व संत, महंत,ज्ञानी महात्मे व सर्व क्षेत्रातील उपस्थित मान्यवरांचा सत्कार श्री.संत गुरू दामुनाथ विठ्ठलनाथ महाराज यांच्या हस्ते झाला.दुपारी महापुजा सोहळा कार्यक्रमात दत्तभजनी मंडळींनी आपली सेवा अर्पण केली. सर्व भाविक भक्तांनी दुपारी २ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत संत आशीर्वचनाचा लाभ घेतला.या कार्यक्रमास आलेल्या सर्व सन्माननीय मान्यवरांचा सत्कार श्री. नवनाथ दामुनाथ डाकोरे गोपाळ चावडीकर यांच्या हस्ते करण्यात आला.महाशिवरात्री महापुजा सोहळा व महाप्रसादाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन सेवादास श्री.संत गुरू दामुनाथ विठ्ठलनाथ महाराज,श्री. नवनाथ दामुनाथ डाकोरे व समस्त गावकरी मंडळी गोपाळचावडी ता.जि.नांदेड यांच्या वतीने करण्यात आले होते व त्याप्रमाणे हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

## नवीन कामगार संहितेच्या नियमांमध्ये सिने कलाकारांसाठी तरतुदी समाविष्ट करण्याबाबत सकारात्मक-मंत्री ॲड. आकाश फुंडकर

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई–** नवीन कामगार संहिता केंद्र सरकारकडून तयार करण्यात आली असून, सदर संहितेअंतर्गत नियमावली तयार करण्यात येत आहे. नियमावलीची अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यापूर्वी जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यात येणार असल्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी सांगितले.

सद्यस्थितीत सिने क्षेत्रातील कलाकारांसाठी, त्यांच्या न्याय्य हक्कांबाबत नवीन कामगार संहितेअंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या नियमांमध्ये तरतुदी करण्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी कामगार मंत्री फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. बैठकीस कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय. ए. कुंदन, कामगार आयुक्त एच. पी. तुम्मोड, उपसचिव रोशनी कदम-पाटील, अभिनेत्री पद्मिनी कोल्हापुरे, पूनम ढिल्लो यांच्यासह मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सिने क्षेत्रातील कलाकार, तंत्रज्ञ व कामगारांसाठी नवीन कामगार संहितेतील तरतुदींबाबत चर्चा करण्यात आली. ज्यामध्ये सामाजिक सुरक्षा, वेतन, विमा, कामाचे तास, कल्याणकारी योजना आदी तरतुदींची अंमलबजावणी याबाबी समाविष्ट आहेत.

यावेळी अभिनेत्री पद्मिनी कोल्हापुरे आणि पूनम ढिल्लो यांनी चित्रपटसृष्टीतील कलाकार, तंत्रज्ञ, सहाय्यक व विविध विभागांतील कामगारांना भेडसावणाऱ्या समस्या मांडल्या.

कामगार मंत्री फुंडकर यांनी सांगितले की, कामगार संहितेमध्ये ऑडीओ-व्हिज्युअल क्षेत्रातील कामगारांसाठी करण्यात आलेल्या तरतुदींनुसार सिने क्षेत्रातील कलाकार व संबंधित कामगारांना कायदेशीर संरक्षण देण्यात आले आहे. त्यानुसार नवीन कामगार संहितेमध्ये त्यांना सामाजिक, आर्थिक संरक्षणाच्या तरतुदी समाविष्ट आहेत.

दैनिक निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस

महाराष्ट्रातील दै. आत्ताच एक्सप्रेस या लोकप्रिय वृत्तपत्राच्या परभणी-नांदेड व हिंगोली आवृत्तीसाठी तालुका व शहर पातळीवर अनुभवी किंवा नवीन पत्रकार नेमणे आहे. ज्यांना पत्रकारीता क्षेत्रात काम करण्याची आवड आहे अशा होतकरु पत्रकारांनी संपर्क करावा.

नांदेड जिल्हा : अर्धापुर, भोकर, बिलोली, देगलूर, हदगाव, हिमायतनगर, कंधार, लोहा, मुदखेड, मुखेड, नांदेड, नायगांव आणी उमरी

परभणी जिल्हा : परभणी, गंगाखेड, सोनपेठ, पाथरी, मानवत, पालम, सेलू, जिंतुर आणि पुर्णा

हिंगोली जिल्हा : हिगोली, कळमनुरी, वसमत, औंढा नागनाथ आणि सेनगाव

लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे
आवृत्ती संपादक : आत्ताच एक्सप्रेस
संपादक : मराठीबाणा न्युज LIVE
अध्यक्ष : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,किनवट

संपर्क कार्यालय : उपजिल्हा रुग्णालय मार्ग,गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड
मो.9022822289, 7066650600
Email : attachexpressparbhani@gmail.com

## ५५ आसनी 'राजमाता जिजाऊ' बस मार्चपासून एसटीच्या ताफ्यात; किनवट आगाराला दिलासा मिळणार का?

* आत्ताच एक्सप्रेस
※ लक्ष्मीकांत मुंडे




**किनवट –** राज्याच्या कानाकोपऱ्यात सुरक्षित आणि कमी खर्चात प्रवास करायचा असेल तर एसटी हा सर्वसामान्यांचा विश्वासू पर्याय मानला जातो. "गाव तिथे एसटी" या धोरणामुळे ग्रामीण भागातील जनतेसाठी एसटी जीवनवाहिनी ठरली आहे. बदलत्या काळानुसार एसटी सेवेत सातत्याने आधुनिकीकरण होत असून आता प्रवाशांसाठी आणखी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने ५५ आसनी अत्याधुनिक 'राजमाता जिजाऊ' बस दाखल होणार आहेत. भगवा व शुभ्र रंगसंगतीत सजलेल्या या बसेस महाराष्ट्राच्या परंपरा, इतिहास आणि अभिमानाचे चालते-बोलते प्रतीक ठरणार आहेत.

सध्या धावणाऱ्या बसमध्ये साधारण ४० प्रवाशांची आसन क्षमता असते; मात्र नव्या बसमध्ये ३२ आसन रचना असून तब्बल ५५ प्रवासी आरामात बसू शकतील. त्यामुळे गर्दीच्या मार्गांवर उभे राहून प्रवास करण्याची वेळ मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गांवर या बसेस सुरू करण्याचा एसटीचा मानस असून प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी आणि सुसज्ज प्रवासाचा अनुभव मिळणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य संकल्पनेमागील प्रेरणाशक्ती असलेल्या राजमाता जिजाऊ साहेब मातृशक्ती, संस्कार आणि स्वराज्यभावनेचे प्रतीक मानल्या जातात. त्यांच्या स्मरणार्थ या नव्या बसेसना 'राजमाता जिजाऊ' असे नाव देण्यात आले आहे. यापूर्वी एसटीने शिवनेरी, शिवशाही, शिवाई, हिरकणी, विठाई आणि लालपरी अशा ऐतिहासिक व सांस्कृतिक नावांनी बससेवा सुरू केली आहे.

दरम्यान एसटीच्या आधुनिकीकरणाच्या घोषणा होत असतानाच किनवट आगारातील समस्या मात्र गंभीरच असल्याचे चित्र आहे. पूर्वी १० लालपरी बस येणार असल्याची घोषणा झाली होती; मात्र प्रत्यक्षात केवळ पाच बस मिळाल्या. जुन्या व जीर्ण बसगाड्या, वारंवार होणारे ब्रेकडाउन, लांब पल्ल्याच्या गाड्यांचा अभाव, ऐनवेळी फ ेऱ्या रद्द होणे या कारणांमुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याशिवाय सुमारे ३५ वाहक, तेवढेच चालक आणि ६ लिपिकांची कमतरता असल्याने आगारावर अतिरिक्त ताण पडत आहे.

मार्च महिन्यापासून राज्यभर 'राजमाता जिजाऊ' बसेस सेवेत दाखल होणार असल्या तरी किनवटसारख्या दुर्गम भागातील आगारांना या सुविधांचा किती लाभ होणार आणि स्थानिक समस्या प्रत्यक्षात केव्हा दूर होणार, हा प्रश्न नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी आधुनिक बससेवा स्वागतार्ह असली तरी किनवट आगाराच्या मूलभूत अडचणी दूर करणे तितकेच आवश्यक असल्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

## पैनगंगा अभयारण्यात 'जॉनी'ला जोडीदार; नव्या वाघीणीमुळे पर्यटनाला नवे आकर्षण

* आत्ताच एक्सप्रेस
※ लक्ष्मीकांत मुंडे



**किनवट –** नांदेड आणि यवतमाळ जिल्ह्यांच्या सीमेवरून वाहणाऱ्या पैनगंगा नदीकाठच्या घनदाट जंगलात तत्कालीन वनमंत्री स्व. नानाभाऊ एंबडवार यांच्या संकल्पनेतून पैनगंगा अभयारण्याची निर्मिती करण्यात आली. जंगलातील गावांचे पुनर्वसन आणि काही तांत्रिक अडचणींमुळे हे अभयारण्य अपेक्षित वेगाने विकसित होऊ शकले नाही; मात्र वन्यजीव विभागाच्या नव्या उपक्रमांमुळे आता येथे पर्यटनाला चालना मिळताना दिसत आहे.

पैनगंगा अभयारण्यात २०१८-१९ मध्ये सोडण्यात आलेला पीएनजी-१ 'जॉनी' हा नर वाघ गेली सहा-सात वर्षे एकटाच वास्तव्य करत होता. त्याला मादी वाघीण नसल्यामुळे नैसर्गिक प्रजननात अडथळा निर्माण होत होता. तसेच भविष्यात जवळच्या नात्यातील संकर टाळण्यासाठी बाहेरील अधिवासातून मादी वाघीण आणण्याचा प्रस्ताव पुढे आला. या संदर्भात ढाणकी येथील वनप्रेमी प्रतीक राठोड यांनी जुलै २०२४ मध्ये मंत्रालयाकडे पाठपुरावा करून वाघसंख्या वाढविण्याची मागणी केली होती.

दोन वर्षांच्या अभ्यासानंतर वनमंत्री गणेश नाईक, तत्कालीन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, विशेष कार्यकारी अधिकारी महेश शेवाळे तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पांढरकवडा विभाग यांच्या पुढाकारातून महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार पेंच व्याघ्र प्रकल्पातून पीकेटी-७-२ ही तरुण मादी वाघीण ७ जानेवारी २०२६ रोजी पैनगंगा अभयारण्यात स्थलांतरित करण्यात आली. तिच्या हालचालींवर वनविभागाने बारकाईने लक्ष ठेवले असून ती नव्या अधिवासात स्थिरावली असून प्रकृती व हालचाली समाधानकारक असल्याची माहिती देण्यात आली आहे.

या उपक्रमामुळे पैनगंगा अभयारण्यात वाघांची नवीन पिढी जन्माला येण्याचा मार्ग मोकळा झाला असून वाघसंख्या वाढीस चालना मिळेल, असा विश्वास वनपरिक्षेत्र अधिकारी धीरज मदने यांनी व्यक्त केला आहे. नर वाघ 'जॉनी' आणि नव्याने आणलेली वाघीण एकत्र आल्याने अभयारण्यातील जैवविविधतेसह पर्यावरणीय संतुलन मजबूत होण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान, किनवटजवळील खरबी येथे पर्यटकांसाठी जंगल सफारी सुरू करण्यात आली असून उमरखेड तालुक्यातील मन्याळी येथे दुसरे प्रवेशद्वार सुरू आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत प्रत्येकी सात वाहनांतून सफारीची व्यवस्था करण्यात आली आहे. पर्यटक मोठ्या उत्साहाने वनभ्रमंतीचा आनंद घेत असून वाघांच्या उपस्थितीमुळे आकर्षण अधिक वाढले आहे.

राज्यातील पुनर्वनीकरण आणि वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टीने हा प्रयोग महत्त्वाचा मानला जात असून स्थानिकांना रोजगारनिर्मिती व परिसराच्या विकासालाही चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत अभयारण्य पर्यटकांसाठी खुले राहणार असून रात्रीच्या वेळी वाहतुकीवर निर्बंध ठेवण्यात आले आहेत.

एकूणच, पैनगंगा अभयारण्यात नर वाघ 'जॉनी'ला मिळालेल्या जोडीदारामुळे जंगलाला नवजीवन मिळत असून उशिरा का होईना, हे अभयारण्य आता पर्यटन नकाशावर ठळकपणे झळकू लागले आहे.

## निराळादेहली तांडा पांदण रस्ता तातडीने मजबुतीकरण करा; ग्रामस्थांची आ. भीमराव केराम यांच्याकडे मागणी

आत्ताच एक्सप्रेस

**किनवट –** किनवट तालुक्यातील निराळा गाव ते देहली तांडा दरम्यानचा सुमारे अडीच किलोमीटर पांदण रस्ता मागील अनेक वर्षांपासून अत्यंत दुरावस्थेत असून या रस्त्याच्या दुरुस्ती व मजबुतीकरणासाठी ग्रामस्थांनी वारंवार शासन दरबारी तसेच तीन आमदारांकडे पाठपुरावा केला; मात्र प्रश्न कायमच प्रलंबित राहिला आहे. विकासाची दूरदृष्टी असलेल्या आमदार भीमराव केराम यांनी हा रस्ता तातडीने करून द्यावा, अशी मागणी निराळा ग्रामस्थांनी केली आहे.

निराळा ते देहली तांडा या मार्गाची अवस्था अत्यंत बिकट झाली असून शेतशिवारात जाणे, वन्यप्राण्यांपासून संरक्षणासाठी हालचाल करणे तसेच देहली तांडा व तालुक्याच्या ठिकाणी ये-जा करताना नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात चिखलाचे साम्राज्य तर उर्वरित काळात खडी, दगड-धोंड्यांमुळे प्रवास धोकादायक ठरतो. या मार्गावरून जाताना वन्यजीवांचा धोका देखील कायम असतो.

या अडीच किलोमीटर रस्त्यापैकी तत्कालीन आमदार डी.बी. पाटील यांच्या प्रयत्नातून सुमारे ८०० मीटरपर्यंत गिट्टी टाकून काम करण्यात आले होते. त्यानंतर तब्बल १५ वर्षे स्व. आमदार प्रदीप नाईक यांच्याकडे पाठपुरावा करूनही उर्वरित रस्त्याचा प्रश्न सुटला नाही. शासनाकडून पांदण रस्त्यांसाठी विशेष निधी उपलब्ध होत असतानाही या मार्गाकडे दुर्लक्ष झाल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली.

तालुक्याच्या विकासाची जाण ठेवून आमदार भीमराव केराम यांनी निराळादेहली तांडा पांदण रस्ता त्वरित पूर्ण करून ग्रामस्थांना दिलासा द्यावा, अशी मागणी सरपंच दिलीप कनाके, उपसरपंच राजेश जाधव, सामाजिक कार्यकर्ते बालाजी ठाकरे, प्रतिष्ठित नागरिक दिनेश महल्ले, अरुण महल्ले तसेच समस्त निराळा ग्रामस्थांनी केली आहे.

हा रस्ता तयार झाल्यास दळणवळण सुलभ होण्याबरोबरच शेतकऱ्यांना, विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार असून परिसराच्या विकासालाही गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मंगनाळी शिवारात जुगार अड्ड्यावर पोलिसांची धडक कारवाई; ₹२.२७ लाखांचा मुद्देमाल जप्त

आत्ताच एक्सप्रेस



**कंधार–** नांदेड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. अविनाश कुमार यांच्या आदेशानुसार कंधार पोलिसांनी तालुक्यातील मंगनाळी शिवारात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर मोठी कारवाई करत अवैध जुगार व्यवसायावर आळा घातला आहे. या कारवाईत पोलिसांनी एकूण ₹२,२७,५८५ किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार मंगनाळी येथील केरबा शिंदे यांच्या शेतात झाडाखाली जुगार सुरू असल्याचे समजताच पोलिसांनी तात्काळ छापा टाकला. छाप्यातून ३ मोटारसायकली, ४ मोबाईल फोन, रोख रक्कम व जुगार साहित्य असा एकूण ₹२,२७,५८५ किंमतीचा माल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी हणमंत शिंदे, चंदन जोगदंड, सूर्यकांत शिंदे यांच्यासह एकूण ८ आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव, पोलीस उपनिरीक्षक आप्पा सानप व त्यांच्या पथकाने केली.

या धाडसी कारवाईबद्दल पोलीस अधीक्षकांनी पथकाचे कौतुक केले असून तालुक्यातील अवैध धंद्यांविरोधात कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा दिला आहे.

## संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त गोकुंद्यात भव्य महाप्रसादाचे आयोजन

आत्ताच एक्सप्रेस



**किनवट –** गोकुंदा येथे संतश्रेष्ठ सेवालाल महाराज यांच्या २८७ व्या जयंतीनिमित्त, वसंतराव नाईक चौक परिसरात भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या धार्मिक व सामाजिक उपक्रमाला नागरिकांचा मोठा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून परिसर भक्तीमय वातावरणाने भारावून गेले.

संतश्रेष्ठ सेवालाल महाराज यांना बंजारा समाजाच्या पारंपरिक रितीरिवाजानुसार विधीवत भोग लावून महाप्रसाद कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. त्यानंतर भाविकांच्या उपस्थितीत भक्तीमय वातावरणात महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन नवयुवक बालाजी राठोड, श्रीनिवास आडे, महेश चव्हाण आदी समाजसेवकांच्या पुढाकारातून करण्यात आले. सकाळपासूनच महाप्रसादासाठी भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. सर्व समाजातील भाविक नागरिकांनी सहभाग नोंदवत दृष्टे युगप्रवर्तक सेवालाल महाराजांच्या विचारांना अभिवादन केले.

कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कैलास चव्हाण, कल्लोळकार प्रा. डॉ. वसंत राठोड, गोरसेना तालुकाध्यक्ष प्रदीप राठोड, रूपसिंग जाधव (से. नि. पोलिस जमादार) , श्याम राठोड (उत्सव ट्रेडिंग कंपनी), मांगिलाल आडे, दिलिप राठोड, बाबुसिंग आडे यांच्यासह असंख्य समाजबांधवांनी मोलाचे सहकार्य केले. यावेळी जगतगुरु सेवालाल महाराजांच्या सामाजिक समतेच्या, सेवाभावाच्या व मानवतेच्या विचारांचा जागर करण्यात आला. महाप्रसादाचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले असून कार्यक्रम शांततामय वातावरणात पार पडला. या उपक्रमामुळे गोकुंदा परिसरात सामाजिक ऐक्य, बंधुभाव व श्रद्धेचे सुंदर चित्र पाहायला मिळाले. आयोजक नवयुवकांचे या स्तुत्य उपक्रमाबद्दल नागरिकांकडून विशेष कौतुक होत आहे.




## गोकुंदा येथे उत्सव ट्रेडिंग कंपनीत जगतगुरु संतश्रेष्ठ सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी

आत्ताच एक्सप्रेस

**किनवट –** गोकुंदा येथील उत्सव ट्रेडिंग कंपनी या प्रतिष्ठानच्या वतीने क्रांतीकारी थोर समाजसुधारक दृष्टेयुगपुरुष संतश्रेष्ठ सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

विशेष बाब म्हणजे, उत्सव ट्रेडिंग कंपनीमध्ये सर्वच महापुरुषांच्या जयंती उत्साहात साजरी करण्याची परंपरा आहे. प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून आजतागायत अखंड सुरू आहे. सामाजिक एकोपा जपणारी ही परंपरा परिसरात आदर्श ठरत आहे.

या कार्यक्रमास कल्लोळकार प्रा. डॉ. वसंत भा. राठोड, से.नि. प्राचार्य बी. के. राठोड, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी रमेश राठोड,कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक पंडित राठोड, प्रतिष्ठानचे व्यवस्थापक श्याम राठोड, कैलास चव्हाण, पांडुरंग राठोड, मुख्याध्यापक रोहिदास राठोड, नितीन जाधव,निखिल राठोड, विनोद पवार ( पत्रकार ) ,धम्मदिप ठोके यांसह परिसरातील व्यावसायिक आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संत सेवालाल महाराज यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत उपस्थितांनी त्यांच्या विचारांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. कार्यक्रम प्रसंगी मिठाई वाटप करून जयंतीचा आनंद साजरा करण्यात आला.

सामाजिक बांधिलकी जपत व्यापारी क्षेत्रातून प्रेरणादायी उपक्रम राबवणाऱ्या उत्सव ट्रेडिंग कंपनीच्या या उपक्रमाचे नागरिकांतून विशेष कौतुक होत आहे.

## शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी प्रशांत लाड, तर उपाध्यक्ष पदी सौ.रेणू टाकळीकर

आत्ताच एक्सप्रेस



**श्रीक्षेत्र माहूर–** येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत दि. ११ फेब्रु.रोजी पालक सभा पार पडली.या सभेत शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी प्रशांत लाड यांची,तर सौ.रेणू टाकळीकर यांची उपाध्यक्षपदी बहुमताने निवड करण्यात आली.

जि. प. च्या केंद्रीय प्राथमिक शाळेच्या व्यवस्थापन समितीमध्ये मराठी विभागाचे ७ तर उर्दू विभागाचे ४ सदस्य असे मिळून एकूण ११ सदस्य आहेत. निवड प्रक्रियेदरम्यान उर्दू विभागाच्या चारही सदस्यांनी मतदानावर बहिष्कार टाकला,त्यामुळे ७ सदस्यांच्या बहुमतावरून अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड करण्यात आली.

शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी, शैक्षणिक गुणवत्तावाढ, विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविणे तसेच मूलभूत सुविधांची उभारणी या विषयांवर सभेत सकारात्मक चर्चा झाली. सर्व सदस्यांनी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्षपदी प्रशांत लाड यांची निवड झाल्याने त्यांचे अभिनंदन होत आहे

## मुरली गावात दश सूत्री कार्यक्रमाचा संकल्प

### साईनाथ महाराज वसमतकर यांच्या कीर्तनातून स्वच्छता, नारी सक्षमीकरण व अध्यात्माचा संदेश

आत्ताच एक्सप्रेस



**श्रीक्षेत्र माहूर–**मुरली गावामध्ये दसूत्री कार्यक्रमाचा संकल्प घेत भव्य कीर्तन व आध्यात्मिक प्रवचन सोहळा उत्साहात संपन्न झाला. महाराष्ट्र राज्याचे स्वच्छता दूत व ब्रँड ॲम्बेसिडर तथा औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय)चे प्रमुख मार्गदर्शक प.पू. राष्ट्रसंत सद्गुरु साईनाथ महाराज वसमतकर यांच्या प्रेरणादायी कीर्तनातून गावकऱ्यांना स्वच्छतेचे महत्त्व, नारी सक्षमीकरण आणि आध्यात्मिक वाटचालीचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या निमित्ताने मुरली गावात संपूर्ण चुलबंद आमंत्रण देण्यात आले होते. गावातील सर्व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत एकात्मतेचे दर्शन घडविले. तसेच संपूर्ण दिवस महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. गावकऱ्यांनी मोठ्या भक्तिभावाने महाप्रसादाचा लाभ घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात गाव स्वच्छता अभियानाने करण्यात आली. त्यानंतर भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास विनम्र अभिवादन करण्यात आले. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी व समतेचा संदेश देण्यात आला.

कीर्तनात महाराजांनी दसूत्री कार्यक्रमाचे महत्त्व विशद करत समाजातील प्रत्येक घटकाने स्वच्छता, शिक्षण, स्त्री-सन्मान आणि अध्यात्म या मूल्यांचा स्वीकार करावा, असे आवाहन केले. त्यांच्या अभंगवाणीने उपस्थित नागरिक मंत्रमुग्ध झाले.

यानंतर गुरू महाराजांचा सत्कार सरपंच शालुना परचाके यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमास उपसरपंच गजानन पडोळे, पोलीस पाटील गजानन भवरे, सदस्य गजानन फुलाते, ग्रामसेवक गोलेमवार, तलाठी प्रल्हाद सोळंके तसेच गावातील असंख्य नागरिक उपस्थित होते.

दरम्यान, शाळेमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. एकूणच, मुरली गावात पार पडलेला हा दसूत्री कार्यक्रम सामाजिक जागृती, स्वच्छता, एकात्मता आणि आध्यात्मिक उन्नतीचा प्रेरणादायी सोहळा ठरला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ ※ **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813